# मनोरमा मल्टीस्टेट को–ऑप. क्रेडिट सोसायटी लि. सोलापूर

मुख्य कार्यालय : बी–१५९, इंदिरानगर, विजापूर रोड, सोलापूर

नोंदणी क्र. MSCS/CR/420/2011 Dt. 13.06.2011

Email-manoramamultistateheadoffice@gmail.com,

Website-www.manoramamultistate.com

## १५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांसाठी)

**मनोरमा मल्टिस्टेट को–ऑप. क्रेडिट सोसायटी लि., सोलापूर संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेची १५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा, शनिवार, दि.१५/०८/२०२६ रोजी ठीक सकाळी ११.३० वाजता पृथ्वी हॉल, हॉटेल बालाजी सरोवर, होटगी रोड, सोलापूर येथे संपन्न होणार आहे, तरी सदर सभेस सभासदांनी वेळेवर उपस्थित राहून सहकार्य करावे ही विनंती.**

### सभेपुढील विषय

१. सभेच्या अध्यक्षांची निवड करणे.

२. दि. १५-०८-२०२५ ची वार्षिक सर्वसाधारण सभेचा इतिवृत्तांत वाचून कायम करणे.

३. दि. ३१.०३.२०२६ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचा अहवाल, लेखापरीक्षकाने प्रमाणित केलेला ताळेबंद पत्रक व नफा तोटा पत्रक वाचून मंजूर करणे व सन २०२४-२५ चे वैधानिक लेखापरीक्षण अहवालाचा दोषदुरुस्ती अहवाल मंजुरीसाठी ठेवणे.

४. सन २०२५-२०२६ ची नफा वाटणी मंजुरीसाठी ठेवणे व संचालक मंडळाने जाहीर केलेला लाभांश मंजुरीसाठी सादर करणे.

५. सन २०२५-२०२६ या सालच्या अंदाजपत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजुरी देणे व सन २०२६-२७ या वर्षाकरिता मा. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या खर्च व उत्पन्नाचा अंदाजपत्रकास मंजुरीसाठी सादर

६. संस्थेच्या सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षासाठी अंतर्गत लेखापरीक्षक व वैधानिक लेखापरीक्षकाची नियुक्ती करणे व मानधन ठरविणे.

७. सन २०२५-२०२६ मधील संचालक मंडळाच्या मासिक सभा, गुंतवणूक सभा, कर्ज कमिटी सभा, एक्झ्युक्युटीव्ह सभा, इतिवृत्तांना मंजुरी देणे.

८. संस्थेच्या इतर ठिकाणी स्थलांतरित केलेल्या शाखांना मान्यता देणे.

९. संस्थेच्या नविन प्रस्तावीत १० शाखा सुरु करण्यास मंजुरी मिळणेबाबत.

१०. संस्थेने खरेदी केलेल्या जागांपैकी काही जागा इतर संस्था अथवा बँकांना भाड्याने देणे अथवा खुल्या जागेवर केलेल्या बांधकामासह विक्री करणेबाबत निर्णय घेणे.

११. संस्थेने २०२५-२०२६ मध्ये खरेदी केलेल्या स्थावर जंगम मालमत्तेस मंजुरीसाठी सादर तसेच सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षात स्थावर जंगम मालमत्ता खरेदी अथवा विक्री करणे संबंधी संचालक मंडळाला अधिकार देणेबाबत मंजुरीसाठी सादर.

१२. निर्लेखन प्रस्ताव वसुलीस अधिन राहून मान्यतेसाठी सादर.

१३. रिक्त पदावर संचालक नेमणूक करण्यास मान्यता घेणे,

१४. पोटनियम दुरुस्ती करणेस परिशिष्ट सूचीनुसार मंजुरीस सादर (परिशिष्ट 'A')

१५. संस्थेस नविन सॉफ्टवेअर / डाटासेंन्टर साठी येणाऱ्या खर्चास संचालक मंडळास मान्यता देणे.

१६. मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.

**स्थळ : सोलापूर**

मा. संचालक मंडळाच्या
आदेशावरून

**दिनांक : ३०/०७/२०२६**

**सौ. कविता कमलाकर कुलकर्णी**
मुख्य कार्यकारी अधिकारी

**सूचना :**

१. गणपूर्तीअभावी सभा तहकूब झाल्यास अर्ध्या तासानी त्याच ठिकाणी सभा घेण्यात येईल. त्या सभेस गणपूर्तीची आवश्यकता असणार नाही.

२. सन २०२५-२०२६ या वर्षीचा वार्षिक अहवाल ताळेबंद पत्रक व नफा-तोटा पत्रक संस्थेच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात आला आहे.

३. ज्या सभासदांना या संदर्भात काही लेखी सूचना द्यावयाच्या असतील त्यांनी नोटीस प्रसिध्द झालेपासून सात दिवसांत कार्यालयीन कामकाजाच्या वेळेमध्ये संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य कार्यालय, यांच्याकडे लेखी द्याव्यात. मुदतीनंतर आलेल्या सूचनांचा विचार केला जाणार नाही.

४. www.manoramamultistate.com या वेबसाईटवर वार्षिक सर्वसाधारण सभेचा अजेंडा, नफा—तोटापत्रक, ताळेबंद पत्रक प्रकाशित केलेला आहे.